www.yuvakadhar.in

E mail - dainikyuvakaadhar@gmail.com

facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार

मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर   निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील   सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : १२७ वा   सोमवार दि. २० जानेवारी २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : ४   RNI MAHMAR/2023/89514

दै. युवक आधार करीता
प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग
खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर,
अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर
प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## पुन्हा एकदा रायगडच्या पालकमंत्री पदाची माळ मंत्री आदिती तटकरे यांच्या गळ्यात

दैनिक युवक आधार

**तळा प्रतिनिधी : नितीन लोखंडे/तळा :** संपूर्ण महाराष्ट्रात विधानसभा 2024 ची निवडणूक पार पडल्यानंतर निकालाच्या दिवशी मतदारांनी आपला कौल महायुतीच्या बाजूने दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे सरकार स्थापन झालं. हिवाळी अधिवेशनानंतर संपूर्ण मंत्र्यांचे खाते वाटप जाहीर करण्यात आले. पण जिल्ह्यांच्या पालकमंत्री पदी कोणा कोणाची वर्णी लागणार याकडे आमदार महोदयांचे आप आपल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचे आणि जनतेचे लक्ष लागून राहिले होते. रायगड जिल्ह्याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिले होते. रायगडचा पालक मंत्री कोण होणार या चर्चांना उधाण आले होते. रायगड जिल्ह्यातील पालकमंत्री पदासाठी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट यांच्यामध्ये रस्सीखेच होती सुरू होती. अखेर या संपूर्ण चर्चांना पूर्णविराम मिळालेला आहे. लाडकी बहीण योजना राज्यामध्ये यशस्वीपणे राबवली गेल्यामुळे एक अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची धुरा पुन्हा एकदा महिला बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्या कडे सोपवण्यात आली. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. यावेळच पालकमंत्री पद महाड चे आमदार मंत्री भरत शेठ गोगावले यांना मिळावे यासाठी रायगड जिल्ह्यातील बिजीपी शिंदेगटाच्या आमदारांनी, कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांकडे आग्रह धरला होता. पण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या या मागणीला तिलांजली देत रायगडच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी पुन्हा मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे देण्यात आल्यामुळे शिंदे गटामध्ये नाराजीचा सूर असल्याचे पाहायला मिळत आहे. मंत्री भरत शेठ गोगावले सुद्धा नाराज असल्याचे चित्र दिसत आहे. ठिकठिकाणी रस्त्यावर शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांकडून आंदोलन करून तटकरेंच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली. पालकमंत्री पदामुळे रायगड जिल्ह्यातील महायुतीमध्ये बिघाडी झाली का असा प्रश्न उपस्थित होत आहे.



========================

## द•ख•ल

### अॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल

दैनिक युवक आधार

**नवीन पनवेल वार्ताहर :** कोकण आगरी रुची हॉटेल सुकापुर या ठिकाणी स्वयंपाकी म्हणून नोकरीस असलेला सचिन यशवंत मोहिते याच्याकडून स्वयंपाकी कामाव्यतिरिक्त सर्व प्रकारची वेठबिगारीची कामे जुलूम जबरदस्तीने करून घेण्यात आली आणि तो आजारी असताना त्याला औषधाची गरज आहे याची जाणीव असताना देखील त्याला डॉक्टरांना न दाखवल्यामुळे त्याचे निधन झाले. या प्रकरणी हॉटेल मालक हेमंत पाटील आणि त्यांचा मुलगा मनीष पाटील यांच्या विरोधात अट्रॉसिटी आणि बीएनएस कलम 105 अन्वये खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.सचिन मोहिते हा माणगाव येथील असून तो आगरी रुची हॉटेल सुकापुर या ठिकाणी दहा वर्षांपासून स्वयंपाकी म्हणून नोकरीस आहे. मात्र त्याच्याकडून जुलूम जबरदस्तीने वेठबिगारासारखे काम करून घेत असल्याचे त्याच्या बहिणीने तक्रारीत म्हटले आहे. 11 जानेवारी रोजी विद्या जाधव यांना भाऊ सचिन मोहितेची तब्येत खराब झाली असल्याचे समजले. त्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल कामोठे या ठिकाणी नेण्यात आले. मात्र 15 जानेवारी रोजी दुपारी त्याचा मृत्यू झाला. सचिन मोहिते यांची प्रकृती गंभीर असून देखील त्याला वैद्यकीय उपचारासाठी डॉक्टरांना दाखवणे आवश्यक असताना त्याला वेळेत वैद्यकीय उपचार मिळाले नाहीत. आणि त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे हॉटेलचा मालक हेमंत पाटील आणि मुलगा मनीष पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### तीन वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार उरण हादरले

दैनिक युवक आधार

**महाराष्ट्र प्रतींनिधी/प्रदीप पाटील**-यशश्री शिंदे कांडा मधून उरणकर सावरतात तोच उरण मोरा फड न.5 मध्ये वास्तव्यास असणाऱ्या 3 वर्षाच्या चिमुरडीवर तिच्या शेजारी राहणाऱ्या नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याच्या घटनेने संपूर्ण उरण हादरून गेले आहे. लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी उरणच्या नागरिकांमधून होत असून सदरची घटना उरण मोरा येथील फड न.5 मोहन स्टोर,सिंडीकेट बँकेच्या जवळील डोंगरावर असणाऱ्या झोपडपट्टी परिसरात घडली आहे.

या कामी मुलीच्या आईने मोर सागरी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदविली असून फिर्यादीत तिने म्हटले आहे.माझे पती, अनुक्रमे 10 व 9 वर्षाची दोन मुले 3 वर्षाची मुलगी व सासरे असा परिवार एकत्रितपणे राहतो 13 जानेवारीस मी मुलीला शेजारच्या आंगणवाडीत सकाळी 11 वाजण्याच्या सुमारास सोडली व दुपारी 1 वाजता तिला घरी आणली असल्याचे तिने आपल्या फिर्यादी मध्ये नोदविले आहे. त्यानंतर आई घरातील आई कपडे धुण्याघरात गेली परंतु मुलगी अंगणात खेळण्यासाठी जाण्या करिता रडू लागलीती बाहेर जाऊ नये म्हणून दाराला प्लॅउड लाऊन अडकून ठेवले मुलगी जोरजोरात का रडते त्यामुळे त्यांचा शेजारी राहणारा दिनेश नितेकर(50)हा तेथे आला व मुलगी रडण्याचे कारण त्यांनी विचारले व मुलीला त्यांनी खेळण्या साठी अंगणात सोडले काही वेळात आई काम आटोपून आली अंगणात मुलगी दिसत नाही पाहून तिने दिनेश नितेकर याल मुली संदर्भात विचारण केली असता मुलगी गल्लीत खेळत असल्याचे त्यांनी सांगितले आईने गल्लीत शोध घेतला परंतु मुलगी दिसत नसल्याने तिने दिनेश नितेकर यास पुन्हा विचारणा केली असता मुलगी संडासाच्या दरवाज्य जवळ असल्याचे तो म्हणाला,आई मुलीला आणण्या साठी गेली असता मुलगी घाबरून आईला बिलगून जोरजोरात रडू लागली आईने उचलून तिला घरी आणले तिला ताप भरला म्हणून उरण मधील अभिनव चाईल्ड केअर क्लिनिक मध्ये नेले असता तेथी डॉ.अजय कोळी यानी तापासून औषध देऊन घरी जाण्यास सांगितले परंतु तीन दिवसा नंतरही ताप उतरला नाही आणि मुलीने दिनेश ककाने शूच्या जागी हात लावल्याचे सांगितले,त्यामुळे मुलीला उरण मधील गाडे हॉस्पिटल मधे नेले असता डॉ.प्रीती गाडे यांनी तिची पूर्ण तपासणी करून गुप्तअंगावर जखमा असल्याचे लेखी पत्रच आईच्या हातात दिल्याने आईच्या पाया खालची वाळू सरकली तिने थेट मोर सागरी पोलीस ठाणे गाठून या बाबत दिनेश निवेतकर यांच्या विरोधात फिर्याद नोंदविली.आरोपी पोलिसांच्या ताब्यात आहे. त्या अनुषगाने दिनेश निवेतकर याच्यावर मोरा सागरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 2023 कलम 62(2), बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण आधी नियम 2012 कलम-4 बालकांचे लैंगिक अपराधा पासून संरक्षण आधी नियम 2012 कलम-6 प्रमाणे गुंन्हादाखल करण्यात अला आहे विद्यमान स्थितीत संशयीत अरोपी दिनेश निवेतकर याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे या संदर्भात मोरा सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## महाराष्ट्राच्या लेकींचा राजमाता जिजाऊ सन्मान पुरस्कार देऊन गौरव क्रीडा सह्याद्री फाऊंडेशन यांच्या या संकल्पनेतून खेळाडूंच्या मातांचा गौरव

दैनिक युवक आधार

**उत्तर महाराष्ट्र विभागीय/संपादक : विनोद गायकवाड/निफाड:** जिल्ह्यातील विविध क्रीडा प्रकारात राष्ट्रीय पातळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंच्या मातांचा क्रीडा सह्याद्री व शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशन व निफाड इंग्लिश स्कूलच्या वतीने राजमाता जिजाऊ सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. निफाड शहरातील सरस्वती विद्यालयातील सभागृहात राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम झाला.यावेळी सरस्वती विद्यालयाचे चेअरमन नंदलालजी चोरडिया,निफाड इंग्लिश स्कुल चे मुख्याध्यापक अरुण महाजन व सौ महाजन, सरस्वती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योती बागडे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले . या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी अरूण महाजन तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.मिलींद महाजन व सौ. प्रज्ञा महाजन, BMC च्या देशातील पहिल्या महिला फायर ब्रिगेड च्या प्रमुख सौ.लता गिते (भाबड), क्रीडा सह्याद्री व शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड ,विनोद गायकवाड हे मान्यवर उपस्थित होते."जिजाऊ तुम्ही नसता तर नसते घडले शिवराय शंभूछावा.. जिजाऊ तुम्ही नसता तर मिळाला स्वराज्याचा ठेवा.. जिजाऊ तुम्ही नसता तर नसते लढले जिद्दीने मावळे.." या युक्तीप्रमाणे आपणही आपल्या पाल्यास जिजाऊ मातेच्या प्रेरणेतून सुसंस्कार देऊन भारताचा एक चांगला नागरिक व खेळाडू बनवण्याची प्रेरणा दिली हे कार्य न विसरण्यासारखे आहे असा उल्लेख शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशनचे अध्यक्ष विलास गायकवाड यांनी आपल्या भाषणातून केले.या शुभ प्रसंगी राष्ट्रीय व राज्य खेळाडूंच्या आई सौ.कावेरी डोंगरे,सौ.ज्योती कुमावत,डॉ.सौ.प्रज्ञा महाजन,सौ. प्रज्ञा अमोल जाधव, सौ.मंगला नितीन बागुल, सौ.लता दिपक गिते ( भाबड),सौ.लता ठाकरे,सौ. पुष्पा सोनार,सौ. कल्पना हिरामण खताळे ,सौ. सरिका दत्तात्रेय घोटेकर, सौ. उषा शंकर कवडे,सौ. मुक्ता विलास नागरे , सौ.सुभावती दिनेश यादव,सौ. रुपाली राजेश काकडे, सौ. सविता योगेश घोटेकर ,सौ. ललिता योगश गाजरे,सौ.छाया प्रकाश पगार, सौ. सीमा सोन्याबापू गंभीरे,सौ.मंगल बद्रीनाथ गंभिरे,सौ. शुभांगी सुधीर काळे,सौ. सविता प्रवीण कोटकर, सौ. रेश्मा नवनाथ साबळे,सौ. रुबिना आलताब पठाण,सौ. वैशाली सचिन ससाणे,सौ.जयश्री प्रदिप शिंदे,सौ.रुकसाना लियाकत तांबोळी, सौ.रोहिणी प्रविण गोळे, सौ.मंगला विनोद गायकवाड,सौ.अर्चना संतोष गाडेकर, सौ.मनिषा सचिन पडोळ,सौ.जयश्री सुनील धुमाळ,सौ. सुषमा जितेंद्र कोचर, सौ.मोनिका सुनील धुमाळ,सौ.कावेरी दशरथ शिंदे,सौ.शारदा अविनाश बिदे,सौ.चंद्रकला मच्छिन्द्र सालमुठे, सौ.स्वाती चव्हाण, सौ.विद्या जाधव यांचा फेटे बांधून मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शाळा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये पदके मिळवणाऱ्या तसेच सहभागी होणाऱ्या खेळाडूंचा गौरव नेहमीच केला जातो. शिवाय या खेळाडूंना प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांचाही सन्मान केला जातो मात्र क्रीडा सह्याद्री व शिव अविष्कार स्पोर्ट्स फाऊंडेशनने पुढाकार घेऊन प्रथमच खेळाडूंच्या मातांचा राजमाता जिजाऊ पुरस्कार 2025 देऊन गौरव केला. याक्षणी पुरस्कार स्वीकारतांना आईच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळतांना दिसले. या कार्यक्रमप्रसंगी श्रीम. निलम बेंडकुळे यांनी सूत्रसंचालन केले व श्री. विलास गायकवाड यांनी आभार मानले.







## दिल्ली पब्लिक स्कूल, पनवेलचा वार्षिक स्नेहसंमेलचा दिमाखदार सोहळा उत्साहात संपन्न

दैनिक युवक आधार

**नवीन पनवेल वार्ताहर**-दिल्ली पब्लिक स्कूल, पनवेल चा दिमाखदार वार्षिक स्नेहसंमेलन दिवस 17 जानेवारी रोजी मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेला वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा हा शैक्षणिक उत्कृष्टतेचा आणि कठोर परिश्रमांचा भव्य उत्सव होता.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा काँग्रेस चे अध्यक्ष महेंद्र घरत, अनुज अग्रवाल व्हाईस चेयरमन डीपीएस, शाळेच्या प्राचार्या साक्षी मिश्रा व संस्थेचे संचालक जितेंद्र सोनी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात झाले. संस्कृतीक कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदना करून करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी मॉन्टी क्रिस्टो या नाटकाची निर्मिती करून आपले आपल्या अंगी असलेल्या विविध कलागुणांचे दर्शन करत विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. ज्यात नाटक ,नृत्य,गायन याचा समावेश होता. या कार्यक्रमाला शेकडो पालक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कला गुण व सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. राष्ट्रगीताच्या सादरीकरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.



## फातिमा शेख यांना काल्पनिक पात्र म्हणणाऱ्या दिलीप मंडल यांची हकालपट्टी करा :- कॉ.महादेव नागरगोजे

दैनिक युवक आधार

**पाटोदा (प्रतिनिधी)** :-क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या खांद्याला खांदा लावून मुलींना शिक्षण देण्याचे काम करणाऱ्या तसेच मुस्लिम समाजातील पहिल्या शिक्षिका फातिमा शेख हे काल्पनिक पात्र आहे असे म्हणून त्यांच्या बद्दल अपमानास्पद वक्तव्य करून मुस्लिम समाज बांधवासह संपूर्ण बहुजन समाजाचा अपमान केल्याबद्दल केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे सल्लागार दिलीप मंडल यांच्या वक्तव्याचा निषेध कॉम्रेड महादेव नागरगोजे यांनी केला असून या संदर्भात दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की अशा दृष्ट प्रवृत्तींना वेळीच जर नाही रोखले तर नंतर उद्या हेच दिलीप मंडल सावित्रीबाई फुले, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे यांना देखील काल्पनिक पात्र म्हणण्यास भिणार नाही. तसेच दिलीप मंडल याचे नाव नभोवाणी मंत्रालयाशी जोडलेले आहे आणि नभोवाणीवर देशातील जनतेचा विश्वास आहे. या मुळे दिलीप मंडल सारखा सल्लागार जर त्या मंत्रालयात असेल तर हा सर्व बहुजन अल्पसंख्याकांचा अपमान आहे. तरी संबंधित मंत्र्यांनी या घटनेची दखल घेऊन असे बेछुट वक्त करणाऱ्या दिलीप मंडल यांच्या वर त्वरित कारवाई करून त्यांची या पदावरून त्वरित हकालपट्टी करावी. अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व किसान सभेचे महाराष्ट्रचे उपाध्यक्ष काँ.महादेव नागरगोजे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

====================

## पादन रस्ता कामाची चौकशीसाठी ग्रामस्थाचे 26 जानेवारी रोजी आंदोलन

दैनिक युवक आधार

**मंठा प्रतिनिधी**-मंठा पाडळी दुधा ग्रामपंचायत अंतर्गत बोगस मातोश्री पांदण रस्त्याचे कामे इस्टिमेट प्रमाणे झालेली नाहीत यातील दोषी असणारे चौकशी करून निलंबित करावे.

या मागणीचे निवेदन अनेक वेळा जिल्हा परिषद दिले मात्र प्रशासनास विनंती करून सुद्धा कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नाही प्रशासना चे लक्ष्य वेधण्यासाठी 26 जानेवारी रोजी उपोषण करण्याचा इशारा प्रसाद अप्पाराव घुगे व बालासाहेब गुलाब घोरसड यांनी दिला.




## संत वामनभाऊ संत भगवानबाबा सेवा प्रतिष्ठान खांदा कॉलनी यांच्या संयुक्त पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

दैनिक युवक आधार

**सुरेश भोईर ( कार्यकारी संपादक)**-खांदा कॉलनी शहरात अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण सोहळा वर्ष१९ वे नित्य नियमाप्रमाणे यावर्षीही रविवार दिनांक १९ जानेवारी२०२५ रोजी कलश पूजन.विनापूजन व ज्ञानेश्वरी पूजन करून प्रारंभ झाले.रोज सकाळी काकड आरती. पारायण. हरीकिर्तन. हरीजागर.व ह. भ.प. पांडुरंग महाराज. ह.भ.प. भागवतभास्कर रोहिदास महाराज शास्त्री . ह.भ.प. सुनिता ताई आंधळे. ह.भ.प. संतोष महाराज वणवे. ह.भ.प. कोकिळाताई वोगोताताई हजारे. ह.भ. प. राधाताई आईसाहेब सानप.यांचे सुश्राव्य कीर्तन सेवा हरिनाम सप्ताह मध्ये झाले रविवार दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी १०ते १२ वाजता ह.भ.प. नारायण महाराज केंद्रे शास्त्री. यांचे काल्याचे किर्तन करून सांगता करण्यात आली.तसेच महाप्रसादाचे आयोजन केले होते तसेच बहुसंख्य भाविकांनी किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला या वेळी शिवसेना रायगड जिल्हा अध्यक्ष रामदास शेवाळे यांनी उपस्थित राहून अखंड सप्ताह हरिनाम सेवेचा लाभ घेतला या कारेक्रमाला सुनील गोरे. राजू गर्जे. सतीश पाटील. किसन बांगर. रामचंद्र ढोबळे. यांच्यावतीने भाविकांसाठी महाप्रसादाचे अन्नदान सेवा समर्पित केली असे कमिटीने वतीने सांगण्यात आले त्यावेळी खांदा कॉलनी परिसरातील हजारोच्या संख्येने भाविक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

====================





## कोकण सुपुत्र कवी,लेखक अशोक लोटणकर यांच्या "निराधार" पुस्तकाचे प्रकाशन

२५ कथांचा कथासंग्रह अमित प्रकाशनातर्फे झाला प्रकाशित

दैनिक युवक आधार

**कोकण वार्ताहर**-रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यामधील साखरपा शहरामधील मुर्शी गावचे सुपुत्र, मुलुंड येथे वास्तव्यास असलेले लेखक, कवी श्री.अशोक लोटणकर यांच्या २१ व्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले.निराधार हा २५ कथांचा कथासंग्रह अमित प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आला आहे. या कथासंग्रहास प्राचार्य आणि समीक्षक दत्ता पवार यांचा अभिप्राय लाभला आहे.कोकणच्या पार्श्वभूमीवर आकाराला आलेल्या कथांमध्ये माणसांचे वास्तव दिसते, अशा शब्दात पवार यांनी आपला अभिप्राय व्यक्त केला आहे.या सगळ्या कथा यापूर्वी विविध मासिके आणि दिवाळी अंकांमधून पूर्वप्रकाशित झाल्या आहेत.लोटणकर यांनी ललित गद्याबरोबरच काव्य,कथा,लघुकथा, बालसाहित्य, समीक्षा अशा साहित्यप्रकारात लेखन केले आहे.अंध विद्यार्थ्यांसाठी त्यांची काही पुस्तके ब्रेललिपीतही प्रसिद्ध झाली आहेत. लोटणकर यांना कोमसाप साहित्य पुरस्कार, कवी कुसुमाग्रज पुरस्कार असे प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले आहेत.श्री.लोटणकर यांची एकूण २१ पुस्तके प्रकाशित झालेली असून त्यांच्या साहित्य कृतींना अत्यंत मानाचे असे ३० हून अधिक साहित्य पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. या पूर्वी त्यांना "कोकण साहित्य रत्न"या पुरस्कारानेही गौरविण्यात आलेले आहे. शिवाय एकता कल्चरल अकादमी, दादा गावकर सामाजिक प्रतिष्ठान, कै.नानासाहेब शेट्ये सामाजिक पुरस्काराने गौरविण्यात आलेले आहे.लोटणकर यांनी ७ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद भूषविले असून ते बी.ई.एस.टी. मधून डेपो मनेजर या पदावरून निवृत्त झालेले आहेत. श्री .लोटणकर हे अनेक शैक्षणिक , सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांशी संबंधित आहेत.रत्नागिरी जिल्ह्यातील साखरपा- मुर्शी गावचे सुपुत्र लोटणकर यांचे हे पुस्तक प्रकाशित झाल्याबद्दल साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर, पत्रकार, वृत्तपत्र लेखक,ग्रामीण मंडळ, विविध संस्था,प्रतिष्ठान पदाधिकारी यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# आय डी बी आय बँकेकडून रीटघर जिल्हा परिषद शाळेला २ संगणक,1 कलर प्रिंट भेट दिला



**दैनिक युवक आधार**

**पनवेल/ वार्ताहरः-** शनिवार दि १८ जानेवारी रोजी आय डी बी आय बँकेकडून दूंदरे ग्रुप ग्रामपंचायत मधील रीटघर रायगड जिल्हा परिषद शाळेला 2 संगणक संच,1 कलर प्रिंट शाळेला भेट दिली.यावेळी आयडीबीआय बँकेच्या नवीन पनवेल शाखेच्या शाखाप्रमुख - शिल्पी जैस्वाल,जुन्या पनवेल शाखेच्या शाखाप्रमुख - मानसी मिश्रा,नवीन पनवेल शाखेचे रिलेशनशिप मॅनेजर - गीतेश पिंपळे,कनिष्ठ सहाय्यक. व्यवस्थापक - रुनल गायकवाड कनिष्ठ सहाय्यक व्यवस्थापक - रोहित घाग सरपंच सुभाष पुंडलिक भोपी, ग्रुप ग्रामपंचायत दुंदरे सरपंच भारत सुभाष भोपी, माजी उपसरपंच जयदास चौधरी, ग्रामपंचायत दूंदरे सदस्य विश्वास पाटील,महेश पाटील तसेच रायगड जिल्हा परिषद शाळा, रिटघर मुख्याध्यापक किशोर थळे आणि शिक्षकवृंद उपस्थित होते.



पर्पल जल्लोष महाउत्सवाचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**पुणे विभागीय प्रतिनिधी/सुनील कलशेट्टी/पुणे (पिंपरी चिंचवड,**मोरवाडी दि.१८ जानेवारी २०२५)–पर्पल जल्लोष महाउत्सवाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते संपन्न. दिव्यांग बांधव हा समाजाचा अविभाज्य घटक असून दिव्यांगाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी त्यांच्या पंखांना बळ देण्याचे काम शासन करेल असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.राज्यात ६५ लाख अपंग असून दिव्यांग बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने माजी सैनिकांना मालमत्ता करामध्ये सवलत दिले जाते त्याप्रमाणे अपंग नाही आता मालमत्ता करात ५०% सवलत दिली जाईल. याबाबतचा प्रस्ताव महापालिकेने रा शासनाकडे पाठवावा. त्याला मंत्रिमंडळाची मान्य देण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी दिले आहे. महापालिकेच्या दिव्यांग भवन फाउंडेशनच्या वतीने पिंपरी चिंचवड (मोरवाडी) येथे दिनांक १७ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत मोरवाडी येथील ऑटो कलस्टर मैदानावर " पर्पल जल्लोष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवसीय कार्यक्रमाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला उमा खापरे, आ. अण्णा बनसोडे, आ. अमित गोरखे, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाचे सचिव राजेश अग्रवाल, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ राजेंद्र भोसले, पी एम आर डी ए आयुक्त योगेश म्हसे, दिव्यांग कल्याण आयुक्त प्रवीण पुरी, पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, दिव्यांग भवन फाउंडेशनचे व्यवस्थापकीय संचालक ओमप्रकाश देशमुख उपस्थित होते.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, दिव्यांग बांधवांसाठीच्या योजना राबविण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ठराविक निधी हा दिव्यांगासाठी खर्च करण्याबाबतचा निर्णय शासन पातळीवर घेण्यात येईल. यासंबंधीचे आदेश देखील आदेश लवकर काढले जातील. राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये दिव्यांगाच्या विविध योजनांसाठी तरतूद केली जाईल यासाठी जिल्ह्यानुसार दिव्यांगांचा आढावा घेण्याचे काम सुरू करण्यात आले आहे . पिंपरी चिंचवड येथील वायसीएम रुग्णालयात दव्यांगणा प्रमाणपत्र दिले जात आहे त्याच धर्तीवर ससून रुग्णालयासह उपजिल्हा रुग्णालयात देखील दिव्यांग व्यक्तींना प्रमाणपत्र देण्यात येईल यासाठी आवश्यक किती निर्देश देण्यात येतील अशी माहिती श्री अजित पवार यांनी दिली.

**अपंग फेरीवाल्यांवर कारवाई नको**
**'अतिक्रमण कारवाई करत असताना विशेष बाब म्हणून अपंग फेरीवाल्यांवर पुणे, पिंपरी चिंचवड महापालिका आणि पीएमआरडीए प्रशासनाने कारवाई करू नये, त्यांच्या उपजीविकेचे साधन काढण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यांना मोकळी जागा द्यावी. अपंगांनीही शहराला बकालपणा येईल, अशा पद्धतीने कुठेही स्टॉल उभारू नयेत असे आव्हान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले**

# सणसर ता.इंदापूर येथील पूल वाहतुकीसाठी खुला




**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय**–संत तुकाराम महाराज पालखी महामार्गचे काम इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथून सुरु होत असून सध्या कारखाना चालू असल्यामुळे सणसर भवानीनगर जाचकवस्ती भागात ऊस वाहतुकीमुळे जास्त प्रमाणात रहदारी वाढत असल्यामुळे संत तुकाराम पालखी महामार्गचे ठेकेदार यांनी वाहतूक सुरळीत होण्यासाठी सणसर गावातील उड्डाणंपूल वाहतुकीसाठी रविवार पासून खुला करण्यात आला.सणसर ओढा परिसरातील नागरिक व माजी ग्रामपंचायत सदस्य शरद कांबळे,सागर महाराज गुप्ते,बाळासाहेब सोनवणे,किरण पाठक,गणेश भोसले यांनी वाहतुकीसाठी होणारी अडचण लक्षात घेऊन रस्त्याचे ठेकेदार एस यु सी इन्फ्रा प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड.यांना शनिवारी वाहतुकीची अडचणी सांगण्यात आल्यानंतर त्यांनी कामाची तत्परता दाखवत रविवारी आपल्या योग्य अशाप्रकारचे नियोजन करून पुलावरून वाहतुक सुरु करण्यासाठी यंत्रणा मार्फत काम मार्गी लावून पूल वाहतुकीसाठी खुला करून देण्यात आला.आणि सणसर परिसरातील सर्वच काम लवकरात लवकर पूर्ण करून देण्याचे आश्वासन दिले.या वाहतुकीमुळे पुढील काळात होणारे अपघात सुद्धा कमी होणार असल्याचे नागरिकांमध्ये चर्चा आहे. पूल सुरु झाल्यामुळे ग्रामस्थ व नागरिक यांनी ठेकेदार यांचे आभार मानून समाधान व्यक्त केले आहे.

===============

# श्री.माधव काईतवाड बोरगडीकर यांची माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती महाराष्ट्र च्या नांदेड जिल्हा कार्याध्यक्ष पदी पदोन्नती



**दैनिक युवक आधार**

**मराठवाडा विभागीय प्रतिनिधी :-राजु शिंदे-**माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती व पोलीस मित्र फांऊन्डेशन महाराष्ट्र .या समितीचे संस्थापक अध्यक्ष श्री.महेशजी सारणीकर सर यांनी समितीमध्ये काम करणाऱ्या अनेक पदाधीकारी यांना पदोन्नती देवुन त्यांच्या गौरव करतांना दिसत आहेत.याच कार्याचा गौरव म्हणुन हिमायतनगर तालुक्यातील छोट्याश्या खेड्यातील श्रीक्षेत्र बोरगडी येथील रहिवाशी व समितीमध्ये मागील दोन वर्षापासुन नांदेड जिल्हा उपाध्यक्ष पदावर कार्य करत होते.माधव काईतवाड बोरगडीकर यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याला पाहता त्यांची माहिती अधिकार व पत्रकार संरक्षण समिती महाराष्ट्र च्या जिल्हा कार्याध्यक्ष पदी पदोन्नती व दैनिक युवक आधार वृत्तपत्रांच्या हिमायतनगर तालुका प्रतिनिधी म्हणुन नियुक्ती करण्यात आली. आजच्या पत्रकारीता क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात डिजिटल मीडिया तसेच दैनिक वर्तमानपत्राद्वारे अनेक पत्रकार कार्य करत आहेत. पत्रकार क्षेत्रातील नव्याने नावलौकिक मिळवलेले हिमायतनगर तालुक्यातील पत्रकार माधव काईतवाड बोरगडीकर यांनी आपल्या प्रखर निर्भीड, लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. तसेच अगदी सामाजिक शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटविला आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजकार्य करत आहेत.त्यामुळे अल्पवधीतच यांनी नावलौकिक मिळवल्याने. त्यांच्या या कार्याला पाहता समितीने यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. यानिवडीसाठी समितीचे संस्थापक अध्यक्ष श्री.महेशजी सारणीकर सर.कार्याध्यक्ष श्री. सखाराम पंत कुलकर्णी.विनोद गायकवाड सर.विकास गोरवाडकर सर.मराठवाडा अध्यक्ष राजु शिंदे सर.ओमप्रकाश पत्रे.नांदेड जिल्हा अध्यक्ष श्री. महादेव उप्पे. सह लोकतंत्र न्युज लाइव्ह चे कार्यकारी संपादक अभिषेक बक्केवाड.बाबाराव जेरगेवाड.नांदेड न्युज लाइव्ह चे संपादक अनिलजी मादसवार.लक्ष्मण भैरेवाड.विजय वाठोरे.दाऊ गाडगेवाड.अंगद सुरोशे. कृष्णा राठोड सह अन्य सहकारी मित्रांनी शुभेच्छा दिल्या.

# हुतात्मा वीर भाई कोतवाल स्मारक समितीचे सचिव अनिल बोरनारे



**दै युवक आधार**

**कल्याण/रशीद शेख**–यांची राज्य शासनाच्या राईट टू एज्युकेशन कायद्याअंतर्गत राज्य सल्लागार परिषदेवर नियुक्ती झाल्याबद्दल हुतात्मा वीर भाई कोतवाल स्मारक समितीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी समितीच्या सदस्यांनी त्यांना शुभेच्छा देऊन सदिच्छा व्यक्त केल्या.बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत" खाजगी शाळांमधील २५ टक्के प्रवेश हे आर्थिकदृष्टया मागास असलेल्या पालकांच्या पाल्यांना मिळावेत याची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सल्लागार परिषद काम करणार असून महाराष्ट्रातील जवळपास १ लाख शाळांमध्ये राज्य सल्लागार परिषद राईट टू एज्युकेशनचे कामकाज पाहणार आहे

# जळगाव जिल्हा पोलिस दल व शहर वाहतूक शाखेतर्फे हेल्मेट रॅलीद्वारे जन जागृती अभियान

## वाहतूक सुरक्षेसाठी काढली रॅली



**दैनिक युवक आधार**

**जळगाव जिल्हा प्रतिनिधी/समाधान पाटील/ जळगाव** : नागरिकांमध्ये हेल्मेट वापराबाबत जनजागृती व्हावी, यासाठी शहर वाहतूक शाखेच्यावतीने शुक्रवारी १७ जानेवारीशहरातून हेल्मेट परिधान करून दुचाकी रॅली काढण्यात आली. या रॅलीद्वारे आमदार सुरेश भोळे, पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांच्यासह अधिका–यांनी सहभाग घेतला.हेल्मेट वापराविषयी जनजागृती होऊन त्याचा अधिकाधिक वापर करून आपली सुरक्षितता जपण्यासाठी हेल्मेट जनजागृतीसाठी रॅली काढली. पोलिस अधीक्षक कार्यालय परिसरातून रॅलीला सुरुवात सुरुवात होऊन नेहरू चौक, टॉवर चौक, चित्रा चौक, नेरी नाका, अजिंठा चौफुली, इच्छादेवी चौक, आकाशवाणी चौक, स्वातंत्र्य चौकमार्गे पोलिस मुख्यालय येथे रॅलीचा समारोप झाला.

======================

# पटेल ज्वेलर्स उरण शाखेकडून हळदीकुंकू समारंभ उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**मकर संक्रातीपासून रथसप्तमीपर्यंत सुरू असणारे हळदीकुंकू म्हणजे महिलांसाठी वेगळीच पर्वणी असते. हळदी कुंकू म्हणजे धार्मिकते सोबतच एकमेकींविषयी बांधिलकी जपणारा ,स्नेह वाढविणारा असा हा समारंभ आहे. ग्रामीण भागात किंवा शहरी घरगुती , सोसायटी,सामाजिक मंडळ, राजकीय व्यासपीठ अशा सर्व ठिकाणी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. पूर्वीच्या काळी शेतीच्या कामात तसेच नेहमीच्या राम रगाड्यात अडकलेल्या महिलांकरता हळदीकुंकू म्हणजे एक विरंगुळा असायचा, आजकाल नोकरी व्यवसाय निमित्त महिला धकाधकीचे जीवन जगत आहेत त्यांच्यासाठीही हा समारंभ एक विरंगुळा ठरत आहे श्रमपरिहार होत आहे. आपले व्यावसायिक संबंध जोपासण्यासाठी , ग्राहकांसोबत ऋणानुबंध राखण्यासाठी शॉपिंग सेंटर, मॉल मध्ये ही हळदीकुंकू समारंभ साजरे होत आहेत. धार्मिकता व सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी पटेल ज्वेलर्स उरण शाखे तर्फे हि उरणमधील महिलांसाठी भव्य स्वरूपात शनिवार दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी श्रीराम मंदिरात हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला होता.पटेल ज्वेलर्स या व्यावसायिक उद्योगाची सुरूवात १९९२ रोजी पनवेलचा "जवेरी बाजार "अशी ओळख असलेल्या जोशी आळीत एका छोट्याशा दुकानात झाली."विश्वास हीच परंपरा "हे ब्रीदवाक्य असलेल्या ब्रँड ने काही वर्षातच ग्राहकांचा विश्वास जिंकण्यात यश मिळवले.श्री मगनभाई पटेल ,श्री प्रफुल पटेल व श्री नवनीत पटेल यांनी १९९२ मध्ये पनवेल मध्ये १५० चौरस फुटाच्या दुकानांमध्ये पटेल ज्वेलर्स या नावाने दुकान सुरू करुन एवढेसे रोप लावले.पण आज पटेल बंधूंचे ग्राहकांशी अदबशीर, आदराने बोलणे, सेवेतील तत्परता, सोन्याची शुद्धता, व्यवहारातील पारदर्शकता या वैशिष्ट्यामुळे आज पटेल ज्वेलर्स नाव आपल्या व्यवसायात प्रसिद्ध होवून नावलौकिक कमावले आहे. त्यामुळे ग्राहकांचा पावले आपोआप या दुकानाकडे वळत आहेत. दिवसेंदिवस ग्राहकांची संख्या वाढल्याने जागाही अपुरी पडत असल्याने दुकानाचा विस्तारा करिता आता या दुकानाचे भव्य शोरूम मध्ये रूपांतर झाले आहे.पहिला मजला हा ७ हजार फुटांमधे अत्याधुनिक सुविधांसह विस्तारला आहे. पनवेल रायगड व नवी मुंबई वासियांसाठी भव्य असे शोरूम खुले केले आहेत. आणि आता दुसऱ्या व तिसऱ्या मजल्याच्या विस्तार होत आहे. व या जागेत मोठ्या शोरूमचे काम चालू असून लवकरच १२ हजार फुटाचे शोरूम ग्राहकांसाठी खुले करण्यात येणार आहे.पनवेलचे पटेल ज्वेलर्सच्या शाखा महाड ,माणगाव , अलिबाग पेण, रोहा ,उरण, रायगड, नवी मुंबई ,तळोजा, कल्याण, ठाणे ,डोंबिवली पर्यंत प्रसिद्ध असून ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.खरेदीसाठी गर्दी होत आहे.दिनांक १८ जानेवारी रोजी पटेल ज्वेलर्स उरण शाखेतर्फे आयोजित केलेल्या भव्य हळदी कुंक समारंभात उरण व उरण च्या आजुबाजूच्या गावांतून आलेल्या महिलांनी या कार्यक्रमास प्रचंड प्रतिसाद दिला. फक्त हळदीकुंकू च नाही तर महिलांसाठी छोटे छोटे खेळ खेळले गेले. या खेळातही सहभागी होऊन महिला वर्गाने आनंद घेतला. तसेच खेळात विजयी झालेल्या महिलांना आकर्षक बक्षीस देऊन गौरवण्यात आले. त्याचप्रमाणे हळदीकुंकू साठी आलेल्या महिलांना आकर्षक भेटवस्तू सौभाग्याचे लेण नथ देण्यात आली व नाष्टा देण्यात आला सोबत तीळगूळ देण्यात आले.पटेल ज्वेलर्स कडून आयोजित केलेला हळदीकुंकू समारंभ यशस्वी व रंगतदार होण्यासाठी जनरल मॅनेजर प्रतीक्षा डायस यांचे मोलाचे योगदान आहे. तसेच पटेल ज्वेलर्स संपूर्ण टिम यांच्या मेहतीने व प्रतीक्षा डायस मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम सुंदररीत्या व सुरळीत पार पडला. सुमारे ३५० हुन अधिक संख्येने महिला वर्ग या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

# चार महिन्यांपासून निराधारांचे थकलेले अनुदान द्या, अन्यथा दिव्यांग संघर्ष समिती संघटनेच्या वतीने तहसीलदारांना घेराव :- जिलानी शेख



**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :-** संजय गांधी निराधार योजनेचा मुख्य उद्देश समाजातील दुर्बल घटकांना आर्थिक मदत करून त्यांचे जीवनमान उंचावणे असा आहे, अशा घटकांनी समाजातील इतर घटकांवर अवलंबून न राहता स्वतःला आत्मविश्वासाने जगता यावे म्हणून ही योजना महाराष्ट्र सरकार सामाजिक न्याय विभागाच्या वतीने सुरू केलेली आहे. या योजने अंतर्गत, निराधार व्यक्तींना आर्थिक सहाय्य म्हणून सध्या दरमहा पंधराशे रुपये मानधन दिले जाते. परंतु सप्टेंबर - आक्टोंबर २०२४ पासून ते आतापर्यंत पाटोदा तालुका व जिल्ह्यातील काही तालुक्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना अद्याप मानधन मिळाले नसल्यामुळे अंध-दिव्यांग, अनाथ मुले, मोठ्या आजाराने ग्रस्त व्यक्ती, वयोवृद्ध, विधवा, घटस्फोटीत महिला, परित्यक्ता महिला, अत्याचारी महिला या सर्व लाभार्थ्यांवर सध्या वाढत्या महागाईमुळे उपासमारीची वेळ येवून ठेपली आहे. शासन स्तरावरून मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या माध्यमातून लाडक्या बहिणींना दरमहा मानधन दिले जाते, परंतु संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभार्थ्यांना गत चार - चार महिन्यांपासून मानधन दिले जात नाही, वर्षभरात बारा महिने ही लाभार्थ्यांकडून दरमहा डिबीटीच्या नावाने कागदपत्रे गोळा करून काहिना काही तांत्रिक अडचणी पुढे करून त्यांची अवहेलना केली जात आहे. हि राज्यासह देशाची फार मोठी शोकांतिका असल्याचे म्हणत दिव्यांग संघर्ष समिती महाराष्ट्रचे संस्थापक जीलानी शेख यांनी संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मानधन लाभार्थ्यांच्या खात्यात त्वरित जमा करण्यात यावे. अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे तसेच मानधन जमा न झाल्यास पुढील आठवड्यात कुठलीच पुर्वसुचना न देता जिल्हाधिकारी कार्यालय येथील संजय गांधी निराधार अनुदान योजना कार्यालयात शेकडो लाभार्थ्यांसह तहसीलदार यांना व संबंधित बीड जिल्हायातील सर्वच तालुक्यातील तहसीलदारांना घेराव घालण्यात येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

=================

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# एसकेज् ,म्युझिक मंत्रा आयोजित "महाराष्ट्राची स्वरगाथा " हा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

## जनजागृती सेवा संस्थेचा प्रिंट मिडीया पार्टनर म्हणून सहभाग






**दैनिक युवक आधार**

**ठाणे वार्ताहर -गुरुनाथ तिरपणकर)**-शर्मिला केसरकर म्हणजे इंटरटेनमेंट,स्वर ताल लय आणि संगीत असा स्वरधारेधारेचा अनोखा मिलाप.म्युझिक मंत्राचा कुठल्याही संगितमय कार्यक्रमाचा आस्वाद घेणे एक पर्वणीच असते.ठाणेकरांना त्याचा प्रत्यय आला.म्युझिक मंत्राच्या संचालिका शर्मिला केसरकर आणि सहा संगीतकारांच्या व गायक कलाकारांच्या साथीने"महाराष्ट्राची स्वरगाथा"हा सांस्कृतिक कार्यक्रम सहयोग मंदीर हॉल,घंटाळी,ठाणे पश्चिम येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.याप्रसंगी गायिका ऑर्गनाझर शर्मिला केसरकर,गायक व सह दिग्दर्शक गणेश मांजरेकर,गायक अतुल खरे,शरद चौधरी,मंगेश पारकर,जितेश,धनंजय बी,डॉ.राजेंद्र काळे,पेंडसे,इंद्रनील,गायिका डॉ.माणिक काळे,संगिता,सोनाली वाळवे,प्रज्ञा तांबे,निलम,ओंमकार दाहोत्रे यांनी गायीलेल्या विविध गाण्यांनी रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.जयश्री सोलकर यांचे लावणी नृत्य लाजबाब होते.महाराष्ट्राची स्वरगाथा या संगितमय कार्यक्रमात नृत्य दिग्दर्शक संदेश पाटील,विडीओग्राफर रविंद्र तिळककर,राकेश,ऑडिओक्राफ्ट भगवान भोईर,संगीत दिग्दर्शक तुषार बने यांचे विशेष सहकार्य लाभले.मध्यांतरा मध्ये उपस्थित प्रमुख पाहुणे या कार्यक्रमाचे मिडिया पार्टनर म्हणुन जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते ऑर्गनाझर शर्मिला केसरकर यांचा शाल,पुष्पगुच्छ,सन्मानपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करुन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघाचे उपाध्यक्ष,विभाग प्रमुख विजय चव्हाण,ध्यान प्रशिक्षक,लेखिका,व्याख्यात्या आरती भार्जा,कवी वृत्तपत्र लेखक मनमोहन रोगे,ॲन्टीपायरसी सेल मुंबई चे तपाशी अधिकारी रामजित गुप्ता,देवांग कोष्टी समाजाचे ठाण्यातील जेष्ठ कार्यकर्ते चंद्रकांत कडुलकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.या सर्वांचा शर्मिला केसरकर व त्यांच्या सहकार्यांनी भेटवस्तू देऊन यथोचित सत्कार केला.उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.शर्मिला केसरकर या म्युझिक मंत्रा या संस्थेच्या माध्यमातून विविध ठीकाणी ऑर्केस्ट्रा आयोजित करत असतातच,आणि सामाजिक बांधिलकी म्हणूनही सामाजिक क्षेत्रातही त्यांचे कार्य अतुलनीय आहे.शर्मिला केसरकर या भाजपा डोंबिवली शहर चित्रपट कामगार आघाडीच्या अध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत.जनजागृती सेवा संस्थेने या कार्यक्रमात प्रिंट मिडीया पार्टनर म्हणून सहभाग घेतला होता.महाराष्ट्रची स्वरगाथा या संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन स्वाती पांचाळ हसमुखाने खुमासदारपणे केले.शेवटी अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

## सीकेटी महाविद्यालयाच्या विद्यार्थीनीला राज्यस्तरीय आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडॉल पुरस्कार २०२५ जाहीर

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून जान्हवी हातमोडेचे कौतुक



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)**-जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील सीकेटी स्वायत्त महाविद्यालयातील जान्हवी ज्योती भास्कर हातमोडे या तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनीला भारत, थायलंड, नेपाळ, श्रीलंका आणि अमेरिकेत कार्य करणाऱ्या प्रसिध्द मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीतर्फे सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्यस्तरीय आदर्श युवा महाराष्ट्र युथ आयडॉल पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जान्हवीचे कौतुक व अभिनंदन करुन पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी भास्कर हातमोडे उपस्थित होते.

## लासलगाव विंचूर रस्त्यावर अपघाताची मालिका सुरुच

**दै. युवक आधार**

**विंचूर प्रतिनिधी/जनार्दन चव्हाण/विंचूर -** विंचूर लासलगाव रस्ता हा जणू मृत्यू चां सापळाच बनत चाललेला आहे आजही कार आणि दुचाकीची समोरासमोर धडक झाल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला आहे, तर दोन जण जखमी झाले आहेत. जखमींना लासलगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. लासलगाव - विंचूर रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम तातडीने सुरू करावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की विंचुर - लासलगाव रोडवर हॉटेल बळीराजा समोर एक दुचाकी व ह्युडांई वरना गाडीचा अपघात झाला. सदर अपघातात दुचाकी MH 15HR 4417 वरील चालक मच्छींद्र बाबुराव गांगुर्डे वय - 18 रा कोकणखेडे ता चांदवड हा मयत असुन त्याचे पाठीमागील विजय शिवाजी सोनवणे वय 18 रा कोकणखेडे हा गंभीर जखमी व समोरील वरना गाडी क्रमांक MH 15 JH 2823 हीचे मालक राहुल बाळासाहेब दरेकर वय 35 रा मरळगोई ता निफाड यांना किरकोळ दुखापत झाली आहे.या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला आहे. दुचाकीवरील एक जन व कारमधील एक जण असे दोघजण गंभीर जखमी झाले आहेत. दोन्ही जखमींवर लासलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत.याच रस्त्यावर या पूर्वी अपघात होऊन अनेक लोकांचा जीव गेला आहे.लासलगाव - विंचूर या रस्त्यावर वाढत्या अपघाताच्या मालिका सुरु असल्यानं या रस्त्याचे लवकरच चौपदरीकरण व्हावे अशी मागणी करत आहे.याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहे.



## धावत्या ट्रेनमध्ये ज्याला ताब्यात घेतले त्याला गुन्हाच नव्हता माहिती, काय केला.. त्याला वाटत होते.

अभिनेता सैफ अली खान याच्यावर चाकू हल्ला करण्याच्या आरोपात संशयीत म्हणून पकडला गेलेला आणि विनाकारण बदनाम झालेल्या आकाश नामक तरुणाचा या प्रकरणाशी काडीचा संबंध नसल्याचे स्पष्ट झाले. मात्र, तोपर्यंत झालेल्या चौकशीने त्याची पुरती त्रेधातिरपट उडवली होती. आपण केले काय अन् झाले काय, अशी स्थिती निर्माण झाल्यामुळे आता पुन्हा 'डब्ल्यूटी' जाणार नाही, असे तो वारंवार ओरडून सांगत होता. खरा आरोपी पोलिसांच्या हाती लागेपर्यंतच्या घटनाक्रमाची शिर्षस्थ सूत्रांकडून



मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे आहे.देशभर चर्चेला आलेल्या या प्रकरणातील संशयीत ज्ञानेश्वरी एक्सप्रेसने कोलकाताकडे पळून जात असल्याचा मेसेज शनिवारी दुपारी मुंबई पोलिसांकडून नागपूर, रायपूर विभागातील रेल्वे पोलीस तसेच रेल्वे सुरक्षा दलाला मिळाला. त्यामुळे रेल्वेची यंत्रणा खडबडून कामाला लागली होती. कथित संशयीताला दुर्ग आरपीएफने धावत्या गाडीत पकडले आणि शनिवारी रात्री देशभरात हे वृत्त प्रसिद्ध झाले. तिकडे संशयीत आरोपी सापडल्याची माहिती कळताच मुंबई पोलिसांचे विशेष पथक तडकाफडकी विमानाने रायपूरला पोहचले. त्यानंतर दुर्ग आरपीएफच्या ताब्यातून त्याला उशिरा रात्री ताब्यात घेऊन हे पथक मुंबईला पोहचले. त्यानंतरच्या काही तासातच दुसरा घटनाक्रम घडला. ज्या गुन्ह्यात संशयीत म्हणून आकाशची चौकशी सुरू होती, त्यातील खरा गुन्हेगार पोलिसांनी जेरबंद केला. नंतर मात्र संशयीत आकाश 'दयेचा पात्र' ठरला.

**गुन्ह्याची जाण, मात्र...**

आकाशला 'त्याने' केलेल्या गुन्ह्याची जाण होती. त्यामुळे दुर्ग आरपीएफच्या ताब्यात असताना त्याने कान पकडून पुन्हा असे करणार नाही, वगैरे सांगितले. केलेल्या गुन्ह्याची 'शिक्षा म्हणून दंड' भरण्याचीही त्याची मानसिकता होती. मात्र, थेट मुंबई पोलिसांनीच येऊन त्याला ताब्यात घेतल्यानंतर तो हादरला. आपण केलेला गुन्हा एवढा गंभीर कधीपासून झाला, हेच त्याला कळेना.

**काय होता गुन्हा**

आरपीएफच्या सूत्रांनुसार, आकाश कुलाबा, मुंबई भागात राहतो. तो ड्रायव्हर म्हणून काम करतो. त्याची आजी बिलासपूर (छत्तीसगड) मध्ये राहते. तिला भेटण्यासाठी तो शनिवारी ज्ञानेश्वरी एक्सप्रेसने नागपूर मार्गे बिलासपूरला जाणार होता. मात्र, रेल्वेतून प्रवास करताना त्याने तिकिटच काढले नव्हते. अर्थात तो विनातिकिट (डब्ल्यूटी) प्रवास करीत होता. दुर्ग आरपीएफने ताब्यात घेतल्यानंतर आपल्याला 'विनातिकिट प्रवासाच्या आरोपात पकडले असावे', असा आकाशचा समज झाला.

# शिवकरमध्ये विकासाचे महापर्व; ०२ कोटी ८२ लाख रुपयांची विकासकामे; आ. प्रशांत ठाकूर व तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)**-शिवकर ग्रामपंचायतीमध्ये करण्यात येणाऱ्या तब्बल ०२ कोटी ८२ लाख ६७ हजार रुपयांच्या दहा विकासकामांचे भूमिपूजन पनवेल विधानसभा मतदार संघाचे कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आज (दि. १९) भूमिपूजन करण्यात आले. आमदार प्रशांत ठाकूर यांचा स्थानिक विकास निधी, २५१५, अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण समाज विकास आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. या कार्यक्रमास भाजपचे तालुका सरचिटणीस व माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, तालुका सरचिटणीस व माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, मागासवर्गीय सेलचे जिल्हाध्यक्ष व माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, सदस्य अविनाश गायकवाड, सुकापूर उपसरपंच महेश पाटील, शैवाक ग्रामपंचायत सरपंच आनंद ढवळे, उपसरपंच रवींद्र ढवळ, माजी उपसरपंच प्रांजल ढवळे, सदस्य मंगेश ढवळे, रितू पाटील, सुरेखा टोपले, रेश्मा पाटील, मनिषा पाटील, मोनिका पोपेटा, संतोष मते, भास्कर पाटील, शंकर महाराज, भरत टोपले, भरत चौधरी, तुकाराम तुपे, बबन ढवळे, गोटीराम ढवळे, गोपीनाथ ढवळे, नजिर शेख, खलील शेख, रमजान शेख, सय्यद शेख, परशुराम ढवळे, अविनाश ढवळे, अरविंद फडके, प्रवीण फडके, सागर ढवळे, अरविंद माळी, निलेश महाराज, समीर पोपेटा, उत्तम पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह




उपस्थित मान्यवरांनी बुद्ध विहारात भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ . बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले. शिवकर ग्रामपंचातीमध्ये या विकासकामांतून गावाचा अधिक विकास साधता येणार आहे, त्यामुळे सरपंच आनंद ढवळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी कौतुक केले. त्याचप्रमाणे शहरांसोबत गावांनाही सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. शिवकर ग्रामपंचायत अंतर्गत घनकचरा प्रकल्प तयार करणे (१८ लाख रुपये), शिवकर येथे अंतर्गत भूमिगत गटार तयार करणे(०८ लाख रुपये), वसंत ढवळे चाळ ते दिक्षा बिल्डींगपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार बांधकाम करणे (१० लाख रुपये), सखाराम ढवळे यांचे घर ते प्रदीप कांबळे याच्या घर पर्यंत रस्ते व गटारे पेव्हर ब्लॉक व भूमिगत विद्युत वाहिनी टाकणे (०१ कोटी ३० लाख रुपये), बुद्ध विहारचे शुशोभीकरण करणे(०८ लाख रुपये), आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन मिशन अंतर्गत हर घर जल हर घर नल अभियान अंतर्गत शिवकर गावात नवीन पाण्याची टाकी बांधणे(३० लाख रुपये), मुस्लिम कब्रस्थानाला संरक्षण भिंत बांधणे व सुशोभिकर करणे (३५ लाख रुपये), बौध्द स्मशानभूमीला संरक्षण भिंत बांधून सुशोभीकरण करणे (२० लाख रुपये), नवीन स्मशानभूमी बांधणे (२० लाख रुपये), आणि व्यायाम शाळेजवळ शौचालय बांधणे (०३ लाख ६७ हजार रुपये) अशा दहा विकासकामांसाठी एकूण ०२ कोटी ८२ लाख ६७ हजार रुपये खर्च करण्यात येणार आहेत. यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचा स्थानिक विकास निधी बरोबरच २५१५, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास आणि अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण समाज विकास निधीची तरतूद केली आहे. यावेळी सरपंच आनंद ढवळे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेहमीच शिवकर ग्रामपंचायतीच्या विकासासाठी निधी देत या गावाचा विकास साधला असल्याचे अधोरेखित आमदार प्रशांत ठाकूर व तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे आभार व्यक्त करत त्यांना धन्यवाद दिले.

=================

## शेअर मार्केट मध्ये जास्तीचा नफा दाखवून फसवणूक करणारी आरोपीला सायबर पोलिसांनी केले जेरबंद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)**: शेअर मार्केट ट्रेडींगमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून खारघर येथील बांधकाम व्यावसायिकाला तब्बल १४.८९ कोटी रुपयांचा ऑनलाईन गंडा घालणाऱ्या टोळीतील एका आरोपीला नवी मुंबई पोलिसांच्या सायबर पोलिसांनी बिहार राज्यातून अटक केली आहे. सुजितकुमार मदनकुमार सिंग (३०) असे या आरोपीचे नाव असून त्याने कंबोडिया देशात जाऊन तेथील चाईनीज लोकांच्या संपर्कात राहून अनेक लोकांची सायबर फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. सायबर पोलिसांनी आता या प्रकरणात सहभागी असलेल्या इतर आरोपींचा शोध सुरु केला आहे.या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी सुजितकुमार सिंग याने आणि या प्रकरणात सहभागी असलेल्या इतर आरोपींनी २०२४ मध्ये संगनमत करुन खारघर भागात राहणाऱ्या बांधकाम व्यावसायिकाला शेअर्स खरेदी विक्री ट्रेडिंगमध्ये जास्तीचा फायदा असल्याचे भासवले होते. तसेच त्यात जास्तीचा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून बांधकाम व्यवसायीकाकडून ऑनलाईन पध्दतीने तब्बल १४ कोटी ८९ लाख रुपये उकळले होते. याबाबत नवी मुंबई सायबर पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर टोळी विरोधात गुन्हा दाखल झाल्यानंतर सायबर पोलिसांनी या गुह्यात वापरण्यात आलेल्या मोबाईल क्रमांकाचे तांत्रिक विश्लेषण केले. या तपासात आरोपी सुजितकुमार हा बिहार येथे असल्याची माहिती सायबर पोलिसांना मिळाली. सदर माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने बिहार राज्यात जावून सुजितकुमार सिंग याला ताब्यात घेतले. त्यानंतर सायबर पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, तो दोन वेळा कंबोडिया देशात गेल्याचे आणि त्याचा या गुह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर सायबर पोलिसांनी त्याला अटक केली. न्यायालयाने या आरोपीची ५ दिवस पोलीस कोठडीत रवानगी केली आहे. प्राथमिक तपासात आरोपी सुजितकुमार सिंग भारतातील इतर काही व्यक्तींच्या संपर्कात असल्याचे आढळून आले असून त्या आरोपींचा सायबर पोलिसांकडुन शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक विशाल पाटील करीत आहेत. दरम्यान, सुजितकुमार सिंग जून २०२३ ते जून २०२४ या कालावधी दोन वेळा कंबोडिया देशात गेल्याचे आणि तेथील चाईनीज लोकांच्या संपर्कात राहून तेथील कॉल सेंटरमध्ये काम करुन भारतात राहणाऱ्या अनेक नागरिकांची सायबर फसवणूक केल्याचे तपासात आढळून आले आहे. तसेच सुजितकुमार सिंग विविध टेलिग्राम ग्रुपच्या माध्यमातून चाईनीज लोकांच्या संपर्कात असल्याचे तसेच त्याने भारतातील सिमकार्ड खरेदी करुन कंबोडिया देशातील साथीदारांना पुरविल्याचे देखील तपासात आढळून आले आहे. पुन्हा तो कंबोडीया देशात जाण्याच्या तयारीत असताना, सायबर पोलिसांनी त्याला जेरबंद केले.

## ज्येष्ठ नागरीक संघाचा २३ वा वर्धापन दिन सोहळा उत्साहात संपन्न

### ज्येष्ठांच्या आर्शिवादामुळे राजकीय आणि सामाजिक कार्य - आमदार प्रशांत ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी)**-शहरातील ज्येष्ठ नागरीक संघाचा २३ वा वर्धापन दिन सोहळा आज (दि. १९) मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यामध्ये आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार विक्रांत पाटील यांचा जाहिर सत्कार ज्येष्ठ नागरीक संघाच्या वतीने करण्यात आला. या सोहळ्याला सिने अभिनेत्री सीमा जाधव, उद्योजक जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ नागरीक संघाचे अध्यक्ष जयंत गुर्जर, सहसचिव भास्कर चव्हाण, माधुरी गोसावी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी ज्येष्ठ नागरिकांसोबत संवाद साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच ज्यांच्या लग्नाला ५० वर्ष पुर्ण झाली अश्या जोडप्यांना आणि ७५ वर्ष म्हणजेच अमृत महोत्सवी वर्ष पुर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरीकांचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त




करताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, आपल्या सर्वांच्या पाठबळामुळे आणि तुम्ही दिलेल्या आर्शिवादामुळेच मला राजकीय आणि सामाजिक कार्य करता आले आणि हे आर्शिवाद मला या शहराला विकासाच्या दिशेने नेण्यासाठी आणि समस्यांपासून मुक्त करण्यासाठी प्रेरणा देत राहतील असे प्रतिपादन केले.

=================

# हत्याराने डोक्यात केले वार, चौघां विरोधात गुन्हा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : हत्याराने डोक्यात वार करून जखमी केल्या प्रकरणी अविनाश फडके, सलाम शेख, आकाश खंडागळे आणि एक अनोळखी ईसमा विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.पंकज चव्हाण हे देवीचा पाडा येथे राहत असून नोव्हेंबर महिन्यात गावाकडील झालेल्या वादावरून त्याने दोघांविरोधात गुन्हा दाखल केला होता. 14 जानेवारी रोजी तो मोटरसायकल वरून पाले खुर्द येथे जाऊन पाण्याच्या टाकीजवळ उभा होता. यावेळी सलाम शेख याने त्याची कॉलर पकडली. त्यानंतर अविनाश फडके व त्याच्यासोबत एक अनोळखी इसम कार मधून खाली उतरला. फडके याने आमच्यावर केस करतो का असे बोलून आम्ही राजकुमार भाई ची माणसे आहोत तुला मारेल असे बोलून सलाम शेख याने त्याच्या चापट मारली आणि फडके व अनोळखी इसमाने हाता बुक्याने मारहाण केली. त्यानंतर चव्हाण पुढे गेला असता आकाश खंडागळे हा तेथे आला व त्याने देखील त्यांना मारहाण केली. त्यानंतर पुन्हा तिघे त्या ठिकाणी कारने आले आणि हत्याराने डोक्यावर वार करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली. आणि त्यानंतर ते तिथून पळून गेले.

==============================

# दुचाकीच्या धडकेत दीपक भिंगारे जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : दुचाकीने दिलेल्या धडकेत पायी रस्ता ओलांडणारे दीपक मारुती भिंगारे हे जखमी झाले. या प्रकरणी पल्सर मोटरसायकल क्रमांक एम एच ०१ ई एस ८२३८ वरील वाहन चालक हर्ष नंदू भारती (वय 21 रा. बोहरा बाजार, सीएसटी, मुंबई) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

14 जानेवारी रोजी शिरढोण येथील दीपक मारुती भिंगारे हे साईप्रसाद हॉटेलच्या समोरील गोडाऊन मधून चहा पिण्यासाठी गोडाऊनच्या गेट समोरील रस्ता ओलांडत होते. यावेळी बजाज पल्सर रसायकलने त्यांना धडक दिली. या धडकेत ते जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

==========================

## महावितरणच्या सहाय्यक अभियंत्याला शिवीगाळ आणि धक्काबुक्की

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**–विज चोरी होत असल्याने कायदेशीर कारवाई करत असताना महावितरणच्या सहाय्यक अभियंत्याला शिवीगाळ करून धक्काबुक्की केल्याप्रकरणी गुरुनाथ धोंगडे यांच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. निलेश बुकटे हे नावडे येथे सहाय्यक अभियंता म्हणून काम करतात. 15 जानेवारी रोजी ते नावडा शाखेतील गावांमध्ये थकीत वीज बिल वसुलीसाठी कर्मचाऱ्यांसोबत गेले होते. गुरुनाथ धोंगडे यांच्याकडे थकीत विज बिल वसुली करता गेले असता त्यांच्या मीटर मधून वीज चोरी होत असल्याचे महावितरणच्या कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. ते सायंकाळी 4:15 वा. सुमारास कर्मचारी यांना घेऊन कारवाई करण्यासाठी गेले असता चोरीबाबत पंचनामा केला. यावेळी गुरुनाथ धोंगडे यांनी त्यांना शिवेगाळ केली व अंगावर धावून आले. त्यानंतर धोंगडे यांनी धक्काबुक्की केली आणि हातातील पंचनामा हिसकावून घेऊन तो फाडला.

========================

# ॲट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : कोकण आगरी रुची हॉटेल सुकापुर या ठिकाणी स्वयंपाकी म्हणून नोकरीस असलेला सचिन यशवंत मोहिते याच्याकडून स्वयंपाकी कामाव्यतिरिक्त सर्व प्रकारची वेठबिगारीची कामे जुलूम जबरदस्तीने करून घेण्यात आली आणि तो आजारी असताना त्याला औषधाची गरज आहे याची जाणीव असताना देखील त्याला डॉक्टरांना न दाखवल्यामुळे त्याचे निधन झाले. या प्रकरणी हॉटेल मालक हेमंत पाटील आणि त्यांचा मुलगा मनीष पाटील यांच्या विरोधात अट्रॉसिटी आणि बीएनएस कलम 105 अन्वये खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.सचिन मोहिते हा माणगाव येथील असून तो आगरी रुची हॉटेल सुकापुर या ठिकाणी दहा वर्षांपासून स्वयंपाकी म्हणून नोकरीस आहे. मात्र त्याच्याकडून जुलूम जबरदस्तीने वेठबिगारासारखे काम करून घेत असल्याचे त्याच्या बहिणीने तक्रारीत म्हटले आहे. 11 जानेवारी रोजी विद्या जाधव यांना भाऊ सचिन मोहितेची तब्येत खराब झाली असल्याचे समजले. त्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल कामोठे या ठिकाणी नेण्यात आले. मात्र 15 जानेवारी रोजी दुपारी त्याचा मृत्यू झाला. सचिन मोहिते यांची प्रकृती गंभीर असून देखील त्याला वैद्यकीय उपचारासाठी डॉक्टरांना दाखवणे आवश्यक असताना त्याला वेळेत वैद्यकीय उपचार मिळाले नाहीत. आणि त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे हॉटेलचा मालक हेमंत पाटील आणि मुलगा मनीष पाटील यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# इंदापूर येथे होणाऱ्या कृषी प्रदर्शनाची जोरदार तयारी सुरु

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय**–इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समिती इंदापूर यांच्या मार्फत बुधवार दि 22 जानेवारी ते रविवार दि 26 जानेवारी पर्यंत कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पुणे जिल्हा मध्य.सहा बँकेचे संचालक व कृषी उत्पन्न बाजार समितीचे जेष्ठ संचालक आणि मार्गदर्शक आप्पासाहेब जगदाळे व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संग्रामसिंह निंबाळकर यांनी दिली. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी बाजारात उपलब्ध होत असलेल्या नवनवीन अवजारे, तंत्रज्ञान यांची माहिती व्हावी.म्हणून यावेळी नवीन जातींचे औषधे,बियाणे,अवजारे,यांचे दुकाने थाटण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.तसेच परराज्यातून नवीन जातीच्या गाई,मैहशी,बैल,घोडे,वेगवेगळ्या जातींचे कुत्रे,पशुपक्षी या कृषी प्रदर्शनात येणार असल्यामुळे तालुक्यातील शेतकरी यांना या कृषी प्रदर्शनासाठी आवश्यक भेट देऊन लाभ घ्यावा अशी विनंती.कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन,व्हा.चेअरमन,सर्व संचालक यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना अहवान केल आहे.

**यावर्षीच्या कृषि प्रदर्शनाचे वैशिष्ट्य म्हणून घोडे व कुत्र्यांची शर्यत आयोजित केली आहे**




# चित्रकलेचा निकाल 100 टक्के

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी**-आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा चित्रकला विषयाचा निकाल 100 टक्के लागला आहे.या शाळेतील एकूण एकवीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.एलिमेंटरी व इंटरमेजिट परीक्षेत A B C या श्रेणीत उत्तीर्ण होऊन घवघवीत यश मिळवले आहे.गटशिक्षण अधिकारी सुधाकर यादव, श्रीमती सिमा टकले, केंद्रप्रमुख जावेद पठाण, सरपंच दादासाहेब घोडके, उपसरपंच भाऊसाहेब घोडके, सामाजिक कार्यकर्ते परमेश्वर घोडके वाहेद पठाण शालेय व्यस्थापन समिती अध्यक्ष उपाध्यक्ष सर्व सदस्य व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले असून,मुलांना कुंडलिक काळे सर व अरूण दातार सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.




## महाकुंभमेळ्यातील आगीत २५ टेंट जळून खाक

महाकुंभात लागलेल्या भीषण आगीत २५ टेंट जळून खाक झाले आहेत. परंतू, जवळपास २०० टेंट आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याचे सांगितले जात आहे. जेवण बनवत असताना आग लागली आणि आजुबाजुच्या टेंटमधील तीन सिलिंडरचा स्फोट झाला.

अग्निशमन दलाने आग विझविली आहे.अखिल भारतीय धर्म संघ आणि गीता प्रेस यांचे संयुक्त शिबिर होते. पश्चिम सीमेवरील क्षेत्राला परिभ्रमण क्षेत्र घोषित करण्यात आले आहे. प्रशासनाने तो परिसर कोणाला दिला आहे हे मला माहित नाही, त्या बाजूने काहीतरी आगीचे लोळ आमच्या बाजूला आले. काहीही शिल्लक राहिले नाही. देवाच्या कृपेने कोणतीही जीवितहानी झाली नाही, असे गीता प्रेस गोरखपूरचे विश्वस्त कृष्ण कुमार खेमका यांनी सांगितले.

========================

## श्री.संत वामणभाऊ व श्री.संत भगवानबाबा यांच्या संयुक्त पुण्यतिथी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**दैनिक युवक आधार**

राम ढाकणे/१९० उरण उरण तालुक्यातील श्री क्षेत्र सोनारी नगरी मध्ये स्वानंद सुखनिवासी वैराग्यमूर्ती श्री. संत वामनभाऊ महाराज व शांतीब्रह्म श्री. संत भगवानबाबा महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने व त्यांच्या संयुक्त पुण्यतिथी निमित्त पाच दिवसाचा अखंड हरिनाम सप्ताह, वर्ष १३ वे ची आज सांगता झाली. दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी, ह.भ.प देवजी महाराज बाबर (रायगड भूषण), ह.भ.प. महेश महाराज साळुंखे (श्री. क्षेत्र पाटणोली) यांच्या हस्ते कलश पूजन करून यांच्याच मार्गदर्शनाखाली पाच दिवसाच्या अखंड अखंड हरिनाम सप्ताहला सुरुवात झाली होती. नगर, बीड, परळी, लातूर, उस्मानाबाद या खेडेगावातून उद्योग धंद्यासाठी मुंबई मध्ये आलेले गरीब कुटुंबातील सर्व जाती धर्माचे पारमार्थिक लोकं, यांच्या एक जुटीने मुंबई मध्ये जवळ जवळ १० ते १२ ठिकाणी अखंड महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेले श्री.संत वामनभाऊ महाराज व श्री.संत भगवान बाबा महाराज यांच्या संयुक्त पुण्यतिथी निमित्ताने सप्ताहाचे आयोजन मोठ्या उत्साहात केले जाते. त्यातीलच भारतातील सर्वात मोठे असलेले जेएनपीटी बंदराच्या जवळच वसलेले उरण तालुक्यातील एक छोटेसे सोनारी गाव. या गावातील व आजुबाजूचे पंचक्रोशीतील सर्वच गावाचे अगदी पारमार्थिक लोकं यांच्या सहकार्याने काशिनाथ शेठ तांडेल यांच्या भव्य इमारती च्या टेरेस वर गेले १३ वर्षापासून अविरतपणे नित्य नेमाने, प्रत्येक वर्षी संयुक्त पुण्यतिथी च्या निमित्ताने पाच दिवसाचा अखंड हरिनाम सप्ताह सोहळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातोय, पहिल्या दिवसापासून ते शेवटच्या दिवसांपर्यंत दैनिक कार्यक्रम काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, हरिपाठ, तसेच नामांकित कीर्तनकार महाराजांचे सुश्राव्य असे कीर्तन होते. सकाळी नाष्टा पासून ते संध्याकाळी किर्तन संपल्यानंतर देखील महाप्रसाद च्या पंगती दिल्या जातात.सोनारी गावातील सप्ताहासाठी, प्रामुख्याने काशिनाथ शेठ तांडेल, राजेंद्र नामदेव ढाकणे, मधुकर महाराज पाटील, आकाश महाराज हालगे, हिराबाई गोवारी, भारती तांडेल, उज्वलाताई कडू, मीनाताई कडू, गंगाबाई कडू, राजेंद्र महाराज केंद्रे, भाऊसाहेब मुंडे तसेच जय भगवान सेवा मंडळ सोनारी, जय भगवान सेवा मंडळ जासई, जय भगवान सेवा मंडळ पागोटे यांचे विशेष सहकार्य लाभले. शेवटी काल्याचे किर्तन ह.भ.प. महेशजी महाराज साळुंखे (भागवताचार्य) श्री राधा गोपाल नाथ श्री संत वामन भाऊ व श्री. संत भगवान बाबा संस्थान पाटणोली , यांच्या किर्तनशेवेने अखंड हरिनाम सप्ताहाची आज सांगता झाली.




## श्रीक्षेत्र बोरगडी येथील 50 वर्षीय शेतकऱ्याचा सर्प दंशाने मृत्यू शासनाकडून तात्काळ शेतकऱ्यास मदतीची मागणी

**हिमायतनगर प्रतिनिधी/माधव काईतवाड/हिमायतनगर:-** तालुक्यातील मौजे बोरगडी येथील शेतकरी महेश्वर आडेलू शेन्नेवाड वय 50 हे आपल्या गट नंबर 95 येथील सर्वे नंबर च्या शेतामध्ये मक्याला पाणी देण्यासाठी दुपारी साडेतीनच्या दरम्यान गेल्या असता तेथे त्यांना विषारी सापाने दंश केला. यात शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना आज दिनांक 19 जानेवारी दुपारी चारच्या सुमारास घडली या घटनेमुळे हिमायतनगर शहराच्या तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे मयत शेतकरी महेश्वर आडेलू शेन्नेवाड (वय 50,रा. बोरगडी) असे मृताचे नाव आहे त्यांच्या कुटुंबास तात्काळ शासनाने आर्थिक मदत करून सहकार्य करावे अशी मागणी गावकऱ्यांकडून केली जात आहे. या बाबत सविस्तर वृत्त असे की नेहमीप्रमाणे आपल्या शेतीमध्ये काबाडकष्ट करून दुपारच्या वेळेला जेवण करून आपल्या शेतातील मक्याला पाणी देण्यासाठी मोजे बोरगडी येथे असलेल्या गट नंबर 95 मधील शेतीला पाणी देण्यासाठी गेले असताना महेश्वर आडेलू शेन्नेवाड वय 50 या शेतकऱ्यास विषारी सापाने यांच्या पायाला दंश केला. सर्पदंश झाल्याने अस्वस्थ वाटत असल्यामुळे व त्यांची प्रकृती गंभीर होऊ नये म्हणून घरच्या मंडळींनी त्यांना तात्काळ हिमायतनगर येथील ग्रामीण रुग्णालयात नेले शहरातील ग्रामीण रुग्णालयाच्या डॉक्टरांनी प्रथमोपचार करून सायंकाळी 4 वाजेच्या दरम्यान त्यांना मृत घोषित केले यांच्या पश्च्यात,वडील पत्नी, दोन मुले,एक मुलगी असा परिवार आहे या घटनेने बोरगडी गावावर शोककळा पसरली आहे व तालुक्यात या घटनेमुळे हळहळ व्यक्त केली जात आहे.





दैनिक युवक आधार - समाजसेवक स्व. मैनुद्दीन शेख यांच्या तृतीय पुण्यस्मरण दिना निमित्त त्यांची कन्या आदर्श शिक्षिका शेख नजमा ताई यांनी विविध क्षेत्रात सामजिक बांधीलकी जपणारे तसेच कर्तृत्व प्रामाणिक लोकांना प्रोत्साहन म्हणून जिल्हा स्तरीय आदर्श पुरस्कार सोहळा आयोजित केला. या सोहळ्यात वैद्यकिय, सामाजिक, पत्रकारिता, राजकीय, शिक्षण सह इतर क्षेत्रातील कार्याची पावती म्हणून जिल्हास्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या वेळी उपस्थित प्रमुख मान्यवर, शेख नजमा ताई, सय्यद समीर सर, आणि आयोजक समितीचे सदस्य

(छाया- दैनिक युवक आधार पाटोदा.)

# चाकूचा धाक दाखवून मोबाईल आणि पिकअप चोरणाऱ्या तीन आरोपींच्या पंढरपूर तालुका पोलीसांनी आवळल्या मुसक्या

## पंढरपूर तालुका पोलीसांची दमदार कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी संतोष लांडे**-चाकूचा धाक दाखवून मोबाईल व पिकअप चोरणाऱ्या तीन आरोपींच्या आवळल्या मुसक्या, 11 लाख 25 हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत, पंढरपूर तालुका पोलीसाची कामगिरी सोलापूर जिल्हा पंढरपूर तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर 45 /2025 बी एन एस कलम 309(6) या रॉबरीच्या गुन्ह्यात तीन आरोपींनी मध्य प्रदेश पासिंगची पिकप गाडी क्रमांक एमपी 09S3010 या गाडीच्या चालकाला चाकूचा धाक दाखवून चालकाला लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत पिकअप गाडी जबरदस्तीने चोरून पिकप गाडी घेवुन पळून गेले होते, पंढरपूर तालुका पोलिसांनी अगदी कसून तपास करीत सदर गुन्ह्यामध्ये आरोपींच्या वर्णनावरून एकूण तीन आरोपी ताब्यात घेण्यात आलेले असून त्यांनी सदरच गुन्ह्यांची कबुली पोलिसांना दिली आहे, सदर गुन्ह्यातील आरोपींची नावे गोविंद लिंबा पवार (वय 23) (रा. अंकोली ता. मोहोळ) निबालअहमद शेख (वय 21) रा. चिंचोली ता. पंढरपूर ) संच्या मिटकरी (वय 32 ) रा.आंबे चिंचोली ता. पंढरपूर ) असे तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडूंन फिर्यादीचे दोन मोबाईल फोन एक पिकअप गाडी त्याचा क्रमांक मप 09 S3010 असा एकूण किंमत रुपये 11 लाख 25 हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात पंढरपूर तालुका पोलिसांना यश मिळाले आहे, सदर तीनही आरोपींना अटक केलेली आहे सदर गुन्हा घडल्यापासून काही तासांतच आरोपींना तात्काळ अटक करून गुन्हा उघडकीस आणण्यात पंढरपूर तालुका पोलिसांना यश आले आहे, त्यांच्या कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून विशेष कौतुक आहे, सदरची कामगिरी माननीय पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर उपनिरीक्षक भारत भोसले पो.कॉ. गजानन माळी पो.कॉ. विनायक क्षीरसागर ए एस आय तोंडले पो.कॉ. रोकडे पो. कॉ.सागर गवळी पो. कॉ. आवटी यांच्या पथकांने केली आहे,



## शेतमालाला भावांतर योजना लागू करा :तहसिलदार कार्यकारी दंडाधिकारी मुखेड यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष शिवशंकर पाटील कलंबरकर यांची मागणी




**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी/चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर/नांदेड मुखेड -**: शेतीमालाला सद्या बाजारात खूप कमी भाव मिळत आहे. शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारात आला की भाव पाडले जातात. सरकारचे खरेदी केंद्र बोटावर मोजण्याइतकेच आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मिळेल त्या भावात सोयाबीन, तूर, कापूस इत्यादी शेतमाल बाजारात विकावा लागतो. म्हणून सरकारने कमी भावात विकलेल्या शेतीमालाला भावांतर योजना लागू करून असलेला भावफरक द्यावा, अशी मागणी तहसीलदार राजेश जाधव यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांकडे शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.सोयाबीनला ०६ हजार रुपये भाव देणार असे सरकारने जाहीर केले होते. शेतकरी आता सोयाबीन बाजारात ४ हजार १०० ते ४ हजार २०० रुपये क्विंटल विकत आहे. हा जवळपास १ हजार ९०० रुपयाचा प्रतीक्विंटल भावफरक आहे. तो सरकारने दिलेल्या शब्दाप्रमाणे शेतकऱ्यांना दिला पाहिजे. सोयाबीनप्रमाणे कापूस, तूर इत्यादी पिकांची तीच अवस्था आहे, असेही कलबरकर यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान पाहता सरकारने कमी भावात विकलेल्या शेतीमालाला भावांतर योजना लागू करून असलेला भावफरक शेतकऱ्यांना द्यावा, अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा मराठवाडा अध्यक्ष शिवशंकर पाटील कलबरकर यांनी केली आहे.यावेळी छावा संघटनेचे युवा तालुकाध्यक्ष गिरीधर पाटील केरुरकर, ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष अशोक बच्चेवार, शाम पाटील इंगोले आदी उपस्थित होते.